पुणे विभाग शिक्षक विधान परिषद निवडणूक

• पुणे • सातारा • सांगली • सोलापूर • कोल्हापूर

प्रा.सचिन सुरेखा नवनाथ सानप

» Ph.D. (Pursuing), SET, M.A. (Political Science)

- सहा. प्राध्यापक,राज्यशास्त्र विभाग, नौरोसजी वाडिया महाविद्यालय,पुणे.
- विश्वस्त,मॉडर्न एज्युकेशन सोसायटी, पुणे.
- मा. विशेष कार्य अधिकारी, मा.मंत्री,उद्योग व मराठी भाषा,महाराष्ट्र राज्य.

@Prof.SachinSanap

आवाहन पत्र

शिक्षकांचा आमदार शिक्षकच हवा..! — प्रा. सचिन सानप

शिक्षक व प्राध्यापक बंधू भगिनींना सस्नेह नमस्कार,

आपण सर्व शिक्षक व प्राध्यापक समाजाचे आणि देशाचे भविष्य / भवितव्य घडविणारे खरे शिल्पकार म्हणून सातत्याने कार्यरत आहोत. आज आपल्यातील एक सहकारी म्हणून पत्ररूपी संवाद साधण्याचे कारण म्हणजे आगामी काळात होणारी पुणे विभाग शिक्षक विधान परिषद निवडणूक होय.

भारतीय राज्यघटनेने शिक्षकांच्या स्वतंत्र आणि प्रभावी प्रतिनिधित्वासाठी विधानपरिषदेत शिक्षक मतदारसंघाची विशेष व्यवस्था निर्माण केली आहे. या व्यवस्थेमागील मूलभूत भावना म्हणजे शिक्षण क्षेत्रातील वास्तव, शिक्षकांचे प्रश्न, त्यांच्या सेवाशर्ती, अडचणी आणि अपेक्षा यांचा आवाज थेट विधिमंडळात पोहोचणे. शिक्षकांच्या दैनंदिन जीवनाशी, त्यांच्या संघर्षाशी आणि शिक्षण व्यवस्थेतील प्रत्यक्ष वास्तवाशी नाळ जोडलेला शिक्षकच हे प्रश्न अधिक प्रभावीपणे समजू आणि मांडू शकतो. म्हणूनच आज शिक्षक मतदारसंघाचे प्रतिनिधित्व केवळ निवडणूक जिंकण्यापुरते मर्यादित न राहता, "शिक्षकांचा आमदार हा शिक्षकच असावा" या भूमिकेला बळ देत शिक्षकांचा खरा आवाज विधानपरिषदेत पोहोचविण्याची ही निर्णायक वेळ आहे.

मी स्वतः राज्यशास्त्र विषयाचा प्राध्यापक असून शिक्षण क्षेत्रात नऊ दशकांचा गौरवशाली वारसा लाभलेल्या मॉडर्न एज्युकेशन सोसायटी (वाडिया कॉलेज परिसर, पुणे) येथे विश्वस्त म्हणून देखील कार्यरत आहे. त्यामुळे मला शिक्षकांच्या प्रशासकीय, शैक्षणिक आणि वैयक्तिक समस्यांची फार जवळून जाणीव आहे. केवळ वर्गात शिकवण्याचाच नव्हे, तर व्यवस्थेत राहून धोरणात्मक निर्णय प्रक्रियेत काम करण्याचा अनुभव मला सातत्याने मिळत आहे. यापूर्वी उच्च व तंत्रशिक्षण विभाग आणि सध्या उद्योग व मराठी भाषा विभागाचे मा. मंत्री यांच्याकडे 'विशेष कार्य अधिकारी' (OSD) म्हणून काम करताना प्रशासकीय यंत्रणा कशी चालते, शासन दरबारी शिक्षकांचे प्रश्न कसे मार्गी लावायचे आणि पाठपुरावा करून तो प्रश्न कसा सोडवला जातो याचा प्रत्यक्ष दैनंदिन अनुभव मी घेत आहे.

माझ्या या बहुआयामी अनुभवातून मी एका निष्कर्षावर पोहोचलो आहे की, शिक्षकांचा संघर्ष हा केवळ रस्त्यावर मांडून चालणार नाही, तर तो मंत्रालयाच्या दालनात आणि विधिमंडळाच्या सभागृहात देखील कायदेशीर व धोरणात्मक मार्गाने सोडवावा लागतो. "वर्गखोलीतील वास्तव आणि प्रशासकीय व्यवस्थेची सखोल जाण" यांच्या समन्वयातून शिक्षकांच्या समस्यांचे उत्तर मिळू शकेल.

पुणे, सातारा, सांगली, सोलापूर आणि कोल्हापूर या पाचही जिल्ह्यांतील प्रत्येक शिक्षक व प्राध्यापकाचा स्वाभिमान, हक्क, संच मान्यता, शिक्षण सेवकांना सेवा संरक्षण, जुनी पेन्शन, सेवाशर्ती, अशैक्षणिक कामातून मुक्ती आणि शैक्षणिक स्वायत्ततेच्या संरक्षणासाठी मला आपल्या खंबीर पाठिंब्याची आणि विश्वासपूर्ण सहकार्याची गरज आहे. शिक्षकांमधूनच उभा राहिलेला आपला एक सहकारी प्रतिनिधी म्हणून आगामी काळात विधिमंडळात आपला आवाज अधिक बुलंद करण्यासाठी आपण सर्वजण एकत्र येऊ आणि आपल्या प्रलंबित प्रश्नांना न्याय देण्यासाठी शिक्षकांचा 'शिक्षक' प्रतिनिधी विधिमंडळात जाण्यासाठी प्रयत्न करूयात...!

आपला नम्र,

प्रा. सचिन नवनाथ सानप

विविध क्षेत्रातील कामगिरी :

मॉडर्न एज्युकेशन सोसायटीचे विश्वस्त म्हणून केलेले कार्य :

१. तासिका तत्त्वावर काम करणाऱ्या शिक्षकांच्या/प्राध्यापकांच्या वेतनात वाढ करून त्यांना वेळेवर वेतन मिळण्याची व्यवस्था केली. तसेच प्रवेश प्रक्रिया किंवा इतर अधिकच्या कामातील सहभागासाठी स्वतंत्र मानधन देण्याची तरतूद केली.

२. वरिष्ठ महाविद्यालयातील सहाय्यक प्राध्यापक पद भरतीसाठी शासन स्तरावर यशस्वी पाठपुरावा केला.

३. संस्थेअंतर्गत पारदर्शक पद्धतीने कालबद्ध पदोन्नती व कार्यमूल्यांकन योजना राबवून ६ ते ७ आणि ७ ते ८ AGP चा लाभ शिक्षकांना मिळवून दिला.

४. शिक्षकांची प्रलंबित वेतनश्रेणी व पगारवाढीची प्रकरणे तातडीने निकाली काढून संबंधित शिक्षकांना लाभ मिळवून दिला.

५. दिवंगत शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या कुटुंबीयांना अनुकंप तत्वावर तातडीने नियुक्त्या देण्यात आल्या. (मागील २ वर्षांमध्ये संस्थेअंतर्गत राज्यात सर्वाधिक १२ उमेदवारांना अनुकंपा तत्त्वावर नियुक्त्या देण्यात आल्या.

६. SIR व तत्सम अशैक्षणिक कामांमधून शिक्षकांना दिलासा मिळण्यासाठी शासनस्तरावर सातत्याने पाठपुरावा आणि प्रसंगी संघर्ष केला.

७. संस्थेच्या विनाअनुदानित विभागात कार्यरत कंत्राटी व नियमित शिक्षक-शिक्षकेतर कर्मचाऱ्यांसाठी कॅशलेस आरोग्य विमा योजना प्रसिद्ध रुबी हॉल क्लिनिक हॉस्पिटलसोबत सामंजस्य करार करून सुरू केली.

८. संस्थेतील शिक्षकांना Faculty Development Programme (FDP), Refresher Course आणि Orientation Programme इत्यादी उपक्रमांमध्ये सहभागी होण्यासाठी सातत्याने प्रोत्साहन आणि मोफत सहभागाची संधी उपलब्ध करून दिली.

९. संस्था पातळीवर संशोधन प्रकल्प, पेटंट, पुस्तके, राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय चर्चासत्रे व शोधनिबंध परिषदांसाठी पुरेसा निधी शासनाकडून उपलब्ध करून दिला.

१०. शिक्षकांच्या सूचनांना निर्णय प्रक्रियेत स्थान देण्यासाठी बैठकांच्या माध्यमातून कर्मचारी व विद्यार्थ्यांशी नियमित संवाद साधला.

११. क्रांतीसूर्य महात्मा ज्योतिराव फुले यांच्या द्विशताब्दी जयंतीचे औचित्य साधून वाडिया महाविद्यालयाच्या अनुदानित विभागात प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थिनींना मोफत प्रवेश उपलब्ध करून देण्यात आला.

विविध क्षेत्रातील कामगिरी :

मॉडर्न एज्युकेशन सोसायटीचे विश्वस्त म्हणून केलेले कार्य :

१२. संस्थेत तक्रार निवारण समिती प्रभावीपणे कार्यान्वित केली; तसेच विद्यार्थिनी व महिला कर्मचाऱ्यांसाठी सुरक्षित कार्यस्थळ आणि POSH समितीची प्रभावी अंमलबजावणी करण्यात आली.

१३. शिक्षकांचे योगदान आणि कार्याची दखल घेऊन प्रोत्साहनासाठी विविध पुरस्कार व विशेष गौरव उपक्रम सुरू केले.

१४. बदलत्या काळानुसार आधुनिक अध्यापन पद्धतीचा विकास करण्यासाठी स्मार्ट क्लासरूम, डिजिटल लॅब, ई-लर्निंग साधने उपलब्ध करून दिली.

१५. शासन प्रशासनाच्या स्तरावर केलेल्या यशस्वी पाठपुराव्यामुळे संस्थेअंतर्गत तीनही महाविद्यालयांना 'स्वायत्त' दर्जा प्राप्त झाला.

१६. विद्यापीठ शिक्षक मान्यता (Teaching Approval) कालबद्ध करण्यासाठी यशस्वी पाठपुरावा केला.

एकलव्य संस्थेच्या माध्यमातून शिक्षण प्रसारासाठी केलेले कार्य :

» एकलव्य संस्थेच्या माध्यमातून मागील दहा वर्षांपासून पुणे शहरात स्पर्धा परीक्षेची तयारी करणाऱ्या गरजू विद्यार्थी व विद्यार्थिनींसाठी मोफत वसतिगृहाची व्यवस्था सुरू करण्यात आली आहे.

» पुण्यात एकलव्य अभ्यासिकेच्या माध्यमातून ग्रामीण भागातील गरीब आणि होतकरू विद्यार्थ्यांना अत्यल्प दरात शैक्षणिक सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत.

» एकलव्य विद्यालय, शिरूर कासार, जि. बीड या ठिकाणी मराठी माध्यमाची अतिशय दर्जेदार शाळा सुरू करण्यात आली असून त्याठिकाणी ऊसतोड कामगारांच्या मुलांकरीता मोफत शिक्षण उपलब्ध करून देण्यात येत आहे.

» शिल्पकार महिला महाविद्यालय, शिरूर कासार, जि. बीड येथे महिलांसाठी रोजगाराभिमुख दर्जेदार उच्च शिक्षणाची सोय मोफत उपलब्ध करून देण्यात आली आहे.

» एकलव्य महिला महाविद्यालय, छत्रपती संभाजीनगर येथे महिलांसाठी दर्जेदार रोजगाराभिमुख उच्च शिक्षणाची सोय मोफत उपलब्ध करून देण्यात आली आहे.

» शिल्पकार विधी महाविद्यालय, लोणीकंद, ता. हवेली, जि. पुणे येथे विद्यार्थ्यांना कायद्याचे शिक्षण देणाऱ्या उपक्रमशील महाविद्यालयाची स्थापना करण्यात आली आहे.

» एकलव्य संस्थेच्या माध्यमातून ग्रामीण भागात स्पर्धा परीक्षा, पोलीस भरतीसाठी प्रयत्न करणाऱ्या युवकांसाठी मोफत प्रशिक्षण शिबिरांचे आयोजन

विविध क्षेत्रातील कामगिरी :

मा. मंत्री, उच्च व तंत्र शिक्षण, आणि मा. मंत्री, उद्योग व मराठी भाषा, महाराष्ट्र राज्य यांचे विशेष कार्य अधिकारी म्हणून जबाबदाऱ्या आणि उपक्रमांतील यशस्वी सहभाग :-

१. 'शासन आपल्या दारी' या मा. मंत्री महोदयांच्या अभिनव संकल्पनेची महाराष्ट्र राज्यातील सर्व विद्यापीठांमध्ये अंमलबजावणी करण्यासाठी समन्वयाची यशस्वी भूमिका पार पाडली.

२. राष्ट्रीय सेवा योजना (NSS), विद्यार्थी कल्याण मंडळ या उपक्रमांचे मा. मंत्री महोदयांनी केलेले सक्षमीकरण व विधिमंडळामार्फत या योजनांसाठी वाढवून दिलेला निधी इत्यादी महत्त्वपूर्ण प्रक्रियांमध्ये सक्रिय सहभाग नोंदविला.

३. नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या (NEP) सुकाणू समिती पासून ते अंमलबजावणी पर्यंतच्या संपूर्ण प्रक्रियेत प्राध्यापक, शैक्षणिक संस्थेचा विश्वस्त आणि विशेष कार्य अधिकारी या तिहेरी भूमिकेतून यशस्वीरीत्या सहभाग नोंदविता आला व शिक्षकांचे आणि शैक्षणिक क्षेत्रातील प्रश्नांचे सखोल आकलन झाले.

४. मराठी भाषा विभागांतर्गत विश्व मराठी संमेलने, अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलने, बाल-युवक आणि ग्रामीण साहित्य संमेलने, संत साहित्य संमेलने, पुस्तकांचे गाव इत्यादी कार्यक्रमांचे देश-विदेशात आयोजन आणि अंमलबजावणीत मा. मंत्री महोदयांच्या मार्गदर्शनाखाली काम करण्याची मिळालेली संधी अनुभव संपन्न करणारी ठरली.

५. वरिष्ठ महाविद्यालयातील सर्व अध्यापकांच्या विकास व प्रशिक्षणासाठी 'महाराष्ट्र राज्य अध्यापक प्रशिक्षण संस्था, पुणे' (MSFDA) या संस्थेच्या स्थापना प्रक्रियेत यशस्वी सहभाग नोंदविला.

६. महाराष्ट्रातील ग्रामीण भागात स्पर्धा परीक्षा विषयक मोफत मार्गदर्शन शिबिरांचे आयोजन.

७. यशदा, बार्टी, सारथी, सकाळ यांसारख्या संस्थांमध्ये विशेष व्याख्यानांचे आयोजन.

८. शालेय, कनिष्ठ आणि वरिष्ठ महाविद्यालयीन शिक्षकांच्या प्रश्नांवर विविध आंदोलनात सक्रिय सहभाग.

माझा संकल्प :

१. १ नोव्हेंबर २००५ नंतर सेवेत आलेल्या सर्व शिक्षक बांधवांना सरसकट जुनी पेन्शन योजना (OPS) लागू करण्यासाठी प्रयत्न करणार.

२. २ फेब्रुवारी २०२४ च्या शासन निर्णयाप्रमाणेच १ नोव्हेंबर, २००५ पूर्वी रुजू झालेल्या विनाअनुदानित, अंशतः अनुदानित तत्त्वावरील शिक्षक सेवेमध्ये रुजू झालेल्या शिक्षकांना जुन्या पेन्शन योजनेचा लाभ मिळावा यासाठी शर्थीने प्रयत्न करणार व प्रसंगी न्यायालयीन लढाई देखील लढणार.

३. "टप्प्याची प्रतीक्षा नव्हे - कालबद्ध पूर्ण अनुदानाचा हक्क!" ही भूमिका घेऊन अंशतः अनुदानित शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना आर्थिक स्थैर्य आणि सेवासुरक्षा मिळवून देण्यासाठी सातत्यपूर्ण प्रयत्न केले जातील.

४. "समान काम - समान सेवा हक्क - न्याय्य वेतन व लाभ!" या भूमिकेतून तंत्रशिक्षण, वैद्यकीय शिक्षण, अभियांत्रिकी शिक्षण, व कौशल्य शिक्षण क्षेत्रातील प्रत्येक पात्र शिक्षकांच्या सेवा व आर्थिक हक्कांचे संरक्षण करण्यासाठी कटिबद्ध राहून सातत्यपूर्ण प्रयत्न करणार.

५. शिक्षकांच्या वेतनातील विलंब, थकीत वेतन देयके व सातव्या वेतन आयोगाशी संबंधित देयके तातडीने अदा / पारीत करून दर महिन्याच्या १ तारखेला शिक्षकांच्या बँक खात्यावर वेतन जमा करण्याबाबतच्या दि. १३/०८/२०१५ रोजीच्या शासन निर्णयाची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी शासन स्तरावर प्रयत्न करणार.

६. निवडणूक, जनगणना, सर्वेक्षण इत्यादी अशैक्षणिक कामांमधून शिक्षकांची कायमची मुक्तता करण्यासाठी शासनास प्रवृत्त करणार आणि प्रसंगी न्यायालयीन लढा देणार.

७. प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक, तंत्रशिक्षण, अभियांत्रिकी, वैद्यकीय शिक्षण आणि वरिष्ठ महाविद्यालयांमधील ग्रंथपाल, शिक्षक, क्रीडा शिक्षक व विशेष विषय शिक्षकांच्या रिक्त पदांची तातडीने भरती करण्यासाठी प्रयत्नशील राहणार.

८. शिक्षकांचा कार्यभार जोपर्यंत शून्य होत नाही तोपर्यंत त्यांना अतिरिक्त (Surplus) शिक्षक म्हणून घोषित करू देणार नाही.

९. स्वयंअर्थसहाय्यित शाळांना टप्प्याटप्प्याने अनुदानाच्या कक्षेत आणण्यासाठी न्याय्य व कालबद्ध धोरण निर्माण करण्याचा आग्रह धरणार.

१०. शिक्षण सेवक योजना कायमची बंद करून विद्यमान शिक्षण सेवकांनाही तातडीने पूर्ण सेवा संरक्षण देण्यासाठी पाठपुरावा करणार.

माझा संकल्प :

११. शिक्षकांना १०/२०/३० वर्षांची आश्वासित प्रगती योजना आणि सरसकट निवड वेतनश्रेणी लागू करण्यासाठी पाठपुरावा करणार.

१२. मुख्याध्यापक, केंद्रप्रमुख व इतर पदोन्नतीतील अडथळे दूर करून शिक्षकांना TET/CTET सक्तीमधून दिलासा देण्यासाठी प्रयत्नशील राहणार व प्रसंगी न्यायालयीन लढा देणार.

१३. शालार्थ व सेवाविषयक बाबी सुलभ करणे - तांत्रिक त्रुटींमुळे वेतन व सेवा नोंदींमध्ये होणारा विलंब कमी करणे; बदली, मान्यता, वरिष्ठता, सेवा पुस्तिका व पदोन्नतीतील प्रलंबित प्रस्ताव निकाली काढणे.

१४. माध्यम स्वातंत्र्य - सर्वच अनुदानित शाळांमध्ये विद्यार्थ्यांच्या मागणीनुसार इंग्रजी अथवा मराठी माध्यम स्वीकारण्याची सोय उपलब्ध करून देऊन अशा शाळांमधील शिक्षकांना अनुदान घोषित करणे.

१५. सर्व अध्यापक व शिक्षकांना कॅशलेस आरोग्य विमा सुविधा लागू करण्यासाठी शासन स्तरावर पाठपुरावा करणार.

१६. कनिष्ठ महाविद्यालय स्तरावर विज्ञान विषयांच्या प्रात्यक्षिकांसाठी प्रचलित २० विद्यार्थ्यांची बॅच व ४५ मिनिटांची तासिका ग्राह्य धरूनच संचमान्यता करण्यात यावी आणि सुधारित निकषांमुळे शिक्षकांची पदे अतिरिक्त ठरू नयेत, यासाठी शासनस्तरावर पाठपुरावा करणार तसेच याबाबत न्यायालयीन लढ्याची सुरूवातही केली आहे.

१७. अकृषी विद्यापीठे व वरिष्ठ महाविद्यालयांतील विद्यमान पदभरती गतिमान व पारदर्शक करण्यासाठी पाठपुरावा करणार.

१८. राज्यातील कृषी विद्यापीठांमधील अध्यापकांच्या रिक्त पदांची भरती प्रक्रिया पारदर्शक व गतिमान करण्यासाठी शासनास प्रवृत्त करणार.

१९. वरिष्ठ महाविद्यालयांप्रमाणे सर्वच शिक्षकांना सेवानिवृत्तीचे वय ५८ वरून ६० वर्षे करण्याबाबत शासनस्तरावर पाठपुरावा करणार.

२०. द्विलक्षी अभ्यासक्रमाचे NSQF मध्ये रूपांतर करताना सुधारित आकृतीबंध तयार करून कार्यरत शिक्षकांची पदे, कार्यभार, वेतन व सेवाशर्ती पूर्णतः सुरक्षित ठेवून या अभ्यासक्रमासाठी अनुदान घोषित करण्यासाठी ठाम पाठपुरावा करणार.

२१. वरिष्ठ महाविद्यालयांतील व विद्यापीठांतील प्राध्यापकांच्या नियुक्ती, पात्रता, सेवाशर्ती, पदोन्नती, Career Advancement Scheme (CAS), वेतनविषयक व इतर शैक्षणिक लाभांच्या संदर्भात UGC Regulations, २०१८ व त्यामध्ये वेळोवेळी करण्यात आलेल्या सुधारित तरतुदींची एकसमान, प्रभावी व तंतोतंत अंमलबजावणी व्हावी यासाठी शासन व विद्यापीठ स्तरावर सातत्यपूर्ण पाठपुरावा करण्यात येईल.

२२ . कंत्राटी शिक्षकांना योग्य व सन्मानजनक वेतन, सातत्यपूर्ण सेवा, सामाजिक सुरक्षा व पात्रतेनुसार नियमितीकरणासाठी स्पष्ट आणि न्याय्य धोरण निर्माण करण्यासाठी शासनाकडे प्रभावी पाठपुरावा करण्यात येईल.

२३ . कर्मचाऱ्यांच्या समस्या व तक्रारींना न्याय देण्यासाठी स्थानिक निरीक्षण समितीची पुनर्रचना करून सक्षम, निष्पक्ष व पारदर्शक तक्रार निवारण यंत्रणा उभारण्यासाठी प्रयत्न करण्यात येतील.

२४ . शासकीय, अनुदानित व अशासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था (ITI) तसेच व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण क्षेत्रातील निदेशक, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या सेवा व वेतनविषयक प्रश्नांना प्राधान्य देण्यात येईल.

२५ . शासकीय व अनुदानित आश्रमशाळांतील शिक्षकांच्या प्रलंबित सेवा, वेतन, पदमान्यता, पदोन्नती, रिक्त पदे, अनुदान आणि निवृत्तिविषयक प्रश्नांना प्राधान्य देण्यात येईल. आश्रमशाळांतील शिक्षकांना अन्य समकक्ष शैक्षणिक संस्थांतील कर्मचाऱ्यांच्या धर्तीवर न्याय्य सेवा व वेतनविषयक लाभ मिळावेत यासाठी शासनाच्या संबंधित विभागांशी समन्वय साधून ठोस पाठपुरावा करण्यात येईल.

२६. किमान कौशल्यावर आधारित व्यवसाय अभ्यासक्रम (MCVC) तसेच अन्य व्यवसाय व कौशल्याधारित अभ्यासक्रमांतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित प्रश्नांसाठी स्वतंत्रपणे पाठपुरावा करण्यात येईल. बदलत्या रोजगार बाजारपेठेशी सुसंगत अभ्यासक्रम, आधुनिक प्रयोगशाळा, आवश्यक साधनसामग्री आणि उद्योगांशी प्रभावी समन्वय साधून व्यवसाय शिक्षणाला रोजगाराभिमुख व प्रतिष्ठित करण्यासाठी प्रयत्न केले जातील.

२७. संस्थाचालकांना भेडसावणाऱ्या अनुदान, पदमान्यता, संचमान्यता, रिक्त पदभरती, वेतनेतर अनुदान, पायाभूत सुविधा, शासन मान्यता, विविध परवानग्या व प्रशासकीय प्रक्रियेतील विलंब यासंबंधीच्या रास्त प्रश्नांसाठी शासनाकडे सकारात्मक पाठपुरावा केला जाईल.

२८. "कार्यक्षम प्रशासन - कालबद्ध निर्णय!" या भूमिकेतून शालेय शिक्षण विभाग, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, कौशल्य विकास विभाग, आदिवासी विकास विभाग आणि संबंधित शिक्षण संचालनालयांमधील प्रशासकीय प्रक्रिया अधिक सुलभ, गतिमान व पारदर्शक करण्यासाठी कालबद्ध निर्णयप्रक्रिया, ऑनलाइन प्रणाली व अधिकाऱ्यांची जबाबदारी निश्चित करणारी व्यवस्था निर्माण करण्याचा आग्रह धरला जाईल.

संपर्क: ९१६८४९१०९०, ९१६८३८९०९०

sachinsanap777 Prof.Sachin Sanap

sachinsanapoffice@gmail.com www.sachinsanap.com

जानकी इमारत, बीएसएनएल कार्यालयासमोर, मॉडेल कॉलनी, शिवाजीनगर, पुणे- ०४